आर.सी.सी.क्र.१०/२०२१
नि. ६७

**सरकारतर्फे सा.क्र. १**

**शपथेवर**

माझे नांव : नानासाहेब पाराजी राउत,
वय : ७४ वर्षे, धंदा : सुतारकाम,
राहणार : रांजणगांव देवी, ता.नेवासा, जि.अहमदनगर

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>** –

१. आरोपी क्र. १ ते ७ यांना मी ओळखतो कारण ते आमचे शेजारी आहेत. माझी शेती रांजणगांव येथील गट क्र. ४४ मध्ये ४ एकर शेती आहे. त्यापैकी २ एकर शेत मी पांडूरंग वाकचौरे यांना खरेदी दिलेली आहे. खरेदी दिल्यापासून आमच्यामध्ये व त्यांच्यामध्ये शेतजमीनीच्या रस्त्याच्या कारणावरून वाद आहेत.

२. घटना दि. २८/०३/२०१७ रोजी सायंकाळी ०५.३० च्या सुमारास गट क्र. ४४ मध्ये घडली होती. त्या दिवशी मी माइया शेतात असताना दिपक वाघचौरे हा माइया शेतात आला. दिपक वाघचौरे मच्छींद्र घ ाडगे यांच्या शेतातुन आला. दिपक वाघचौरे ज्या रस्त्याने आमच्या शेतात आला तोच रस्ता आमच्या जाण्येण्याचा रस्ता आहे. त्यावेळी माझा मुलगा नामे सचिन हा तळवट घेवुन आला व दिपक वाघचौरेला म्हणाला की, तुझी बैलगाडी काढुन घे. त्याला दिपक वाघचौरेने नकार दिला. म्हणुन माइया मुलाने त्याची मोटारसायकल बाजुन घेवुन जात असताना दिपक वाघचौरे म्हणाला की, तु पुढे ये मी तुझे तुकडे करतो. त्यानंतर माझा मुलगा पुढे जाउन थांबला असता त्याची पत्नी योगिता तेथे आली त्यानंतर पांडुरंग वाघचौरे, रूक्मीनीबाई पांडुरंग वाघचौरे, संगिता वाघचौरे हे तेथे आले. पांडुरंग वाघचौरे यांनी माइया मुलाची गचंडी धरली व रूक्मीनीबाई व संगिता यांनी माझी सुन योगिता हिला मारहाण केली. मी स्वत: भांडणाची सोडवासोडव केली व त्यानंतर आम्ही सर्व सर्वजण आमच्या वस्तीवर आलो. त्यावेळी माझा नातु विशाल सुर्यकांत राउत हा छपरात झोपला होता. परशुराम व दिपक यांनी माझा नातू विशाल याच्या

डाव्या हातावर आणि उजव्या पायावर दांडयाने मारले. संजय पांडुरंग वाघचौरे आणि पांडुरंग माधव वाघचौरे हे दोघे खाटापाशी आले व माइया मुलाला धरले व ओडत ओडत १० फुट अंतरावर नेले. त्यानंतर दिपक व परशुराम या दोघ ाांनी लाकडी दांडयाने माझा मुलगा सुर्यकांत याला मारले. त्यानंतर पांडुरंग माधव वाघचौरे यांनी माइया कानसुळात मारली त्यामुळे मी खाली पडलो व त्यानंतर पांडुरंगने मला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. सदर मारहाणीत मला बरगडीला मार लगाला. दिवस मावळायला लागल्यामुळे व शेजारी वाघ ाचौरे यांचीच वस्ती असल्यामुळे आमच्या मदतीला कोणी आले नाही. त्यावेळी राजू गाढेकर हा मळयात आला होता. त्याने सर्व पाहिले होते परंतु त्याबाबत बोलण्याची त्याची हिंमत झाली नाही. राजु गाढेकर याने त्याच्या मोटारसायकलवरून मला कुकाणा पोलीस चौकीत नेले. मी व माझा मुलगा सुर्यकांत कुकाण पोलीस चौकीत गेलो. त्यावेळी तेथे त्यांनी नेवासा पोलीस ठाण्यात जाण्यास सांगितले म्हणुन मी, माझा मुलगा सुर्यकांत व नातु विशाल असे नेवासा पोलीस ठाण्यात गेलो. तेथे पोलीसांनी मला व माझा मुलगा सुर्यकांत यांना दवाखान्यात जाण्यासाठी कागद दिला. त्याप्रमाणे आम्ही नेवासा फाटा येथील सरकारी रूग्णालयात गेलो. मला व माझा मुलगा सुर्यकांत यांना औषधोपचार केला. त्यानंतर सकाळी पोलीस रूग्णालयात आले व माझा जबाब घेतला. आता तो जबाब मला दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ६८** देण्यात येते. माझा नातु विशाल याला मार लागल्यामुळे शनिशिंगणापुर येथील हॉस्पीटलमध्ये दाखल केले. तेथे तो २ दिवस ॲडमीट होता. ज्या लाकडी दांडक्याने व काठीने मारहाण झाली होती ते पाहिल्यास मी ओळखू शकतो. आता मला पी आर क्र. ६२/२४ वरील दोन लाकडी दांडके व दोन खनपुडाच्या काठया दाखविण्यात आल्या. हे तेच लाकडी दांडके व काठया आहेत ज्याने आम्हाला मारहाण झाली होती. लाकडी दांडक्याला अ.क्र. मटेरिअल ऑब्जेक्ट क्र. अ, ब आणि लाकडी काठीला क आणि ड

देण्यात येते. आरोपी क्र. १ ते ६ आजरोजी न्यायालयात उपस्थित आहेत. **(आरोपी क्र. ७ न्यायालयात गैरहजर आहे. आरोपी क्र. ७ साठी निशाणी ६६ वर गैरहजेरी माफीचा अर्ज ओळख आव्हानित न करण्याच्या अटीवर मंजुर.)**

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपीतर्फे विद्वान वकिल श्रीमती व्ही. एन. जोशी यांचेमार्फत उलटतपास सुरू.</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी सुतार काम करतो. मी गट क्र. ४४/१ मध्ये राहतो. मला गट क्र. ४४ ची माहिती आहे. गट क्र.४४ चे दोन भाग पडलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.४४ चे एकुण ५ भाग पडलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.४४ मध्ये पुर्व—पश्चिम अशी वहिवाट आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.४४/३ पुर्व बाजु ही आरोपींची आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ४४ मधील पुर्व बाजु ही आरोपींची व पश्चिम बाजु ही माझी आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.४४ च्या पुर्व बाजुला आरोपी त्यानंतर महिपती आणि खाली पश्चिमेला दक्षिण बाजुकडुन मी आणि अश्विनी वाघचौरे असे आहोत.हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गट क्र. ४४ च्या बाजुला गट क्र. ४५ व त्यानंतर राजंनगाव ते भानसहिवरा असा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी जेव्हा रूक्मीनीबाईला विकली तेव्हा ती जिरायती होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर रूक्मीनीबाईने गट क्र. १३२ मधुन पाटातुन व पाईपलाईनने पाणी त्यांच्या शेतात आणले. हे म्हणणे खरे आहे की, या केस नंतर मी आरोपींविरूद्ध रस्ता केस दाखल केलेली आहे. माझे गट क्र. ४४ मध्ये १५६ गुंठे शेत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सध्या ५—६ वर्षापुर्वी बोअर घेवुन मी माझी जमीन बागायती केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी जमीन बागायती केल्यामुळे रूक्मीनबाईला दिलेली जमीन मला पुन्हा मिळावी अशी अभिलाषा मला झाली. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९६ साली मी र.रू. १५ हजाराकरीता संजय वाघचौरे यांना दोन वर्ष मुदतीचा शर्तीचा कागद करून दिला. हे म्हणणे खरे आहे की, सदर कागद

माइया एकुण ४ एकर क्षेत्रापैकी २ एकर क्षेत्राचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजपर्यंत मी आरोपींना १५ हजार रूपये परत न देता सदर क्षेत्र माइया ताब्यात आहे. त्याबाबतचा पुरावा मी न्यायालयात सादर करू शकतो.

**न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**

**उलटतपास तहकुब**

श्रवणोत्तर स्विकृती

स्वाक्षरीत/—

(लीना अ. काळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.४,नेवासा

दिनांक :१४/१०/२०२५